आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२४ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रशियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्र्यांचं मायदेशी आगमन
- हवामान बदलामुळे पायाभूत सुविधांवर प्रतिकूल परिणाम होत असून त्यामुळे विकासाची गती मंदावल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीत प्रतिपादन
- चीन किंवा जपानपेक्षा भारतात शिक्षणासाठी जास्त खर्च करण्यात येतो असा युनेस्कोच्या पाहणीचा निष्कर्ष
- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरु

  **आणि**
- भारत- न्यूझीलंड दुसऱ्या क्रिकेट कसोटीला पुण्यात प्रारंभ/ उपाहारापर्यंत न्यूझीलंडच्या २ बाद ९२ धावा

**<><><><><>**

रशियातल्या कझान इथं सोळाव्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी झाल्यानंतर काल रात्री प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मायदेशी आगमन झालं. ब्रिक्स शिखर परिषद अतिशय फलदायी होती, असं त्यांनी सांगितलं. या शिखर परिषदेत अनेक मुद्यांवर जगभरातल्या विविध नेत्यांसोबत प्रधानमंत्री मोदी यांची चर्चा झाली. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, तिथलं सरकार आणि जनतेचे त्यांनी आभार मानले.

**<><><><><>**

हवामान बदलामुळे पायाभूत सुविधांवर प्रतिकूल परिणाम होत असून त्यामुळे विकासाची गती मंदावल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन काल म्हणाल्या. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी इथे भरलेल्या जागतिक बँक आणि

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वार्षिक बैठकीत त्या बोलत होत्या. आर्थिक गर्तेत सापडलेल्या देशांना कर्ज फेडण्यासाठी नव्या आर्थिक ताणाला सामोरं जावं लागू नये यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची गरज असल्याचंही सीतारामन यांनी यावेळी अधोरेखित केलं. या दौऱ्यादरम्यान सेंटर फॉर ग्लोबल डेव्हलपमेंटने आयोजित एका चर्चासत्रात जागतिक प्रगतीसाठी बहुपक्षीय विकास गरजेचा असल्याचं प्रतिपादन सीतारामन यांनी केलं.

**<><><><><>**

चीन किंवा जपानपेक्षा भारतात शिक्षणासाठी जास्त खर्च करण्यात येतो असं युनेस्कोच्या पाहणीत आढळलं आहे. भारतात शिक्षणावरचा खासगी आणि सरकारी खर्च आशियातल्या इतर देशांपेक्षा जास्त असल्याचं युनेस्कोच्या अहवालात म्हटलं आहे. २०१५ ते २०२४ या काळात शिक्षणाला प्रोत्साहन देण्याकरता स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक १ दशांश टक्के ते ४ पूर्णांक ६ दशांश टक्के खर्च भारतात करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंतच्या कालावधीसाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टांमधे म्हटलंय की राष्ट्राच्या जीडीपीच्या ४ ते ६ टक्के तरतूद शिक्षणासाठी असावी.

**<><><><><>**

राजस्थान आणि उत्तर प्रदेश विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. राजस्थामधल्या चौरासी विधानसभा मतदारसंघासाठी तर उत्तर प्रदेशमध्ये कुंदरकी, गाझियाबाद, खैर, करहल, फुलपूर, कटेहरी आणि मझवा या मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे. श्रोते येत्या २५ तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली असून विविध पक्षांनी उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, काही उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपल्या उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली.

**पालघर** विधानसभा मतदारसंघातून नरेश कोरडा आणि विक्रमगडमधून सचिन सिंगडा यांना मनसेने उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीच्या वतीने इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे आज वरळी मतदार संघातून अर्ज दाखल करत आहेत. मुलुंड मतदार संघात भाजपाचे मिहिर कोटेचा यांनी अर्ज दाखल केला. मनसेचे ठाणे मतदारसंघातले उमेदवार अविनाश जाधव यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये घटक पक्षाला जागा मिळल्यानं नाराज झालेल्या इच्छुकांचा पक्षांतराचा ओघ सुरूच आहे. माजी आमदार आणि भारतीय जनता पक्षाचे नेते सुरेंद्र माने यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

**नाशिक**मधल्या येवला लासलगाव मतदार संघातले शिवसेनेचे माजी आमदार कल्याणराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तर शिक्षक मतदार संघातले माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात कुडाळ इथं झालेल्या महायुतीच्या पक्ष मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी खासदार निलेश राणे यांनी काल शिवसेना पक्षात प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या उमेदवारांच्या याद्याही जाहीर होत आहेत.

**<><><><><>**

जळगाव जिल्ह्यातल्या कसोदा गावाजवळ पोलिसांनी काल रात्री दीड कोटी ४५ लाख रुपयांची रोख रक्कम जब्त केली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस काल रात्री एरंडोल विधानसभा परिसरात गस्त घालत होते.  त्यावेळी एका कारची तपासणी केली असता त्यात हे पैसे आढळून आले. ही रक्कम कोणाची आहे याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान अंमळनेर तालुक्यात एका कारमधून १६ लाख ३८ हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **मुंबई पश्चिम उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

व्हिएन्ना ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताचा रोहन बोपन्ना आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू एबडन या जोडीचा सामना ब्रिटनचा नील स्कुपस्की आणि न्यूझीलंडच्या मिशेल व्हिनस या जोडीशी आज होणार आहे. सायंकाळी चार वाजून ५० मिनिटांनी सामन्याला सुरुवात होईल.

याआधी झालेल्या सामन्यात रोहन बोपन्ना आणि मॅथ्यू एबडन या जोडीने रॉबीन हास आणि अलेक्झांडर इव्हेरव यांचा २-६, ७-५, १०-५ असा पराभव केला होता.

**<><><><>**

भारतीय पुरुष हॉकी संघाचा सामना आज दुपारी दिल्लीत मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियमवर जर्मनीशी होणार आहे. सामन्याला दुपारी दोन वाजता सुरूवात होईल. पहिल्या सामन्यात भारताला जर्मनीविरुद्ध ०-२ असा पराभव पत्करावा लागला होता.

**<><><><>**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित प्रवीण लोणकरला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. प्रवीणचा लोणकरचा भाऊ शुभम हा अद्यापही फरार असून पोलिस त्याच्या शोधात आहेत. शुभमच्या संपर्कात असलेल्या चौघांना मुंबई पोलिसांनी काल चौकशीसाठी ताब्यात घेतलं होतं, तर पुण्यातून आणखी तिघांना काल रात्री ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

न्यूझीलंड विरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याला आज पुणे इथं सुरुवात झाली. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीला उतरलेल्या कर्णधार टॉम लॅथम आणि डेव्हॉन कॉनवे यांनी पहिल्या विकेटसाठी ३२ धावांची भागीदारी केली. आर. अश्विन याने लॅथमला बाद केल्यानंतर फलंदाजीला आलेल्या विल यंग यालाही अवघ्या १८ धावांवर बाद केलं. त्यानंतर कॉनवे अवघ्या ७६ धावांवर झेलबाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ३ बाद १६९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन सामन्याच्या मालिकेतला पहिला एकदिवसीय सामना आज दुपारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. दुपारी दीड वाजता सामना सुरू होईल.

<><><><><>

अल्बानियात तिराना इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या विश्वजित रामचंद्र मोरे या कुस्तीगीरानं कांस्यपदक पटकावलं. त्यानं पुरुषांच्या ५५ किलो ग्रीको रोमन गटात ॲडम उलबाशेव्हचा १४-१० असा पराभव केला. या स्पर्धेतलं भारताचं हे पहिलचं पदक आहे.

**<><><><>**

बंगालच्या उपसागरात तयार झालेलं दाना चक्रिवादळ आज मध्यरात्री ओडिशा किनारपट्टीवरच्या भितरकनिका आणि धामरा या प्रदेशांदरम्यान धडकण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दानाच्या भूभागावरचा वेग ताशी १०० ते १२० किलोमीटर असून उद्या पहाटेपर्यंत त्याचा प्रभाव राहील. सध्या हे चक्रीवादळ ओडिशाच्या किनारपट्टीपासून २४० किलोमीटर अंतरावर असून ते ताशी १२ किलोमीटर वेगाने पुढे जात आहे. या वादळामुळे ओडिशातील केंद्रपारा, बालासोर, मयूरभंज, जगतसिंगपूर आणि भद्रक या जिल्ह्यांत जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मच्छिमारांना समुद्रात जायला बंदी घालण्यात आली आहे. चक्रीवादळाचा धोका असल्याने ओडिशाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसंच, भुवनेश्वर इथल्या बिजू पटनायक आंतरराष्ट्रीय विमानतळावरची सर्व उड्डाणं आज संध्याकाळी पाच ते उद्या सकाळी नऊ वाजेपर्यंत रद्द झाली आहेत. किनारपट्टी भागात राहणाऱ्या नागरिकांना मदत केंद्रात हलवण्यात येत असून सर्व शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठं तसंच अनेक सरकारी संस्था शुक्रवारपर्यंत बंद राहतील.